**आजचा सुविचार**

आनंद ही अशी वस्तू आहे जी तुमच्याजवळ नसतानाही तुमची इच्छा असल्यास, तुम्ही ती दुसऱ्याला देऊ शकता.

दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३३८

पाने : ०४, किंमत : ०३ रुपये

संपादक : विनोद कैलास गोरे

RNI NO. : MAHMAR/2022/82056

Follow Us On : www.aksharaj.com

Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.१९ जुलै २०२५

## पंढरपूरातील २१३ सफाई कामगारांना ६०० चौरस फुटांची घरे - उपमुख्यमंत्री अजित पवार



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१८, पंढरपूर :** सुधारित पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरू असून त्यामध्ये पंढरपूर शहरातील सफाई कामगारांसाठी सदनिका बांधकामांचा समावेश आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह काही लोकप्रतिनिधींकडून सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार पंढरपूर शहरातील २१३ सफाई कामगारांना प्रत्येकी ६०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या सदनिका देण्यात येतील. त्यासाठी ५५ कोटी ६१ लाख रुपयांचा खर्च प्रस्तावित आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य हेमंत रासने यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना ते बोलत होते.

पंढरपूर शहरातील सफाई कामगारांना घरे देण्याच्या प्रकल्पामध्ये एकूण १३ इमारती आणि २१३ रहिवासी युनिट आहेत. या १३ इमारतींपैकी १२ इमारती ४ मजली असून, एक इमारत ५ मजली आहे. त्यामध्ये रस्त्यालगत असलेल्या ७ इमारतींमध्ये २४ दुकानांचे गाळे आहेत. या सफाई कामगारांना लवकरात लवकर घरे देण्याच्या दृष्टीने आजच स्थानिक लोकप्रतिनिधी आणि सोलापूर जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करण्यात येईल आणि त्यांना योग्य ते निर्देश देण्यात येतील. या सफाई कामगारांच्या प्रलंबित घरांचा प्रश्न तातडीने निकाली काढण्यात येईल आणि त्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी माहितीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

## एसटीला विठ्ठल पावला! १ लाख ३४ हजार भाविकांची बसने वारी

**दि.१८, नाशिक :** पायी वारी करीत पंढरपूरला जाण्याइतपत वेळ आणि शारीरिक श्रम करणे शक्य न झालेल्या जिल्ह्यातील सव्वालाखांहून अधिक भाविकांना राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नाशिक विभागाने विठूरायाचे दर्शन घडविले. आषाढी यात्रा काळात १ लाख ३४ हजार भाविकांना एसटीने पंढरपूरची वारी घडविली असून, यातून महामंडळाला ३ कोटी ३० लाखांचे उत्पन्न मिळाले आहे.

विशेष म्हणजे, अन्य प्रवाशांच्या तुलनेत ७५ वर्षांवरील सर्वाधिक ४२ हजार १५८ प्रवाशांना 'अमृत' योजनेच्या माध्यमातून मोफत प्रवासाचा लाभमिळाला आहे. पंढरपूरमध्ये विटेवर उभा असलेला श्रीरंग हे संपूर्ण महाराष्ट्राचे दैवत आहे. वर्षातून किमान एकदा तरी विठूरायाच्या चरणी लीन व्हावे अशी प्रत्येक भाविकाची श्रद्धा असते. हजारो वारकरी पायी वारी करून आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरला दर्शनासाठी जात असतात. परंतु, इच्छा असूनही अनेकांना ही पायी वारी शक्य होत नाही.

अशा भाविकांकरिता राज्य मार्ग परिवहन महामंडळ दरवर्षी विशेष बससेवा पुरविते. एका गावातून ५० हून अधिक भाविक पंढरपूरला जाणार असल्यास थेट गावातून बस उपलब्ध करून दिली जाते. याशिवाय प्रवाशांचा ओघ अधिक असल्यास वेगवेगळ्या आगारांमधून जादा बसेस उपलब्ध करून दिल्या जातात.

**साडेपाच लाख किमी प्रवास !**

यंदाही महामंडळाच्या नाशिक विभागाने ३ ते १० जुलै या कालावधीत जादा बसेसची सुविधा उपलब्ध करून दिली होती. या काळात २२६ बसने तब्बल १,६७७ फेऱ्या पूर्ण केल्या.

## एकुलता एक प्रणव गेलेला रानात... पण माघारी फक्त बकऱ्याच परतल्या...

**दि.१८, बुलढाणा :** ग्रामीण भागात लहान मुलांना शहरासारखं मुलाप्रमाणे पोहणे शिकवावं लागत नाही जन्मातच ते सभोताल नदी नाले डोह हे पाहत असतात आणि त्यासोबतच वेळप्रसंगी आनंद लुटत असतात. मात्र एखाद्या हाच पाण्याचा लोट जीवघेणा ठरतो अशीच काहीशी घटना बुलढाण्यात समोर आली आहे. बकऱ्या चारण्यासाठी गेलेल्या पंधरा वर्षीय मुलाचा अंधेरा गावालगत असलेल्या डोहात बुडून मृत्यू झाल्याची घटना १५ जुलै रोजी सायंकाळी उघडकीस आली.

अंढेरा येथील रहिवासी केशव ब्रह्मानंद इंगळे यांना एक मुलगा आणि एक मुलगी आहे. यामधील पंधरा वर्षाचा मुलगा प्रणव इंगळे हा या वर्षी दहावी मध्ये शिक्षणाचे धडे घेत होता. त्यांच्या घरी चार ते पाच बकऱ्या होत्या. त्यामुळे तो घरी आपल्या बकऱ्या चारण्यासाठी वडिलांना मदत करत असे. १५ जुलै रोजी आई-वडील शेतात काम करीत असल्याने प्रणव हा बकऱ्या चारण्यासाठी घेऊन गेला होता.

सायंकाळी बकऱ्या घरी आल्या. मात्र मुलगा बकरी सोबत घरी आला नाही म्हणून आई-वडिलांनी शोधाशोध सुरू केला असता गावालगतच असलेल्या नंदू सानप यांच्या शेत गट क्रमांक २३६ मधील शेताजवळ डोहाजवळ त्याच्या हातातील कुऱ्हाड काठावर पडलेली दिसून आली. म्हणून गावकऱ्यांनी लोखंडी गळ पाण्यात टाकून शोधले असता. गळाला लागून मुलाची बॉडी काढण्यात आले. या घटनेची माहिती ठाणेदार रुपेश शक्करगे, पीएसआय गजानन वाघ, फुसे यांनी घटनास्थळी गाठून पंचनामा केला.

प्रणवचा पाय डोहात घसरला आणि तो खोल पाण्यात पडला. मात्र त्याला पोहता येत नसल्याने तो पाण्यात बुडाला असावा असा अंदाज वरतीना येत आहे.आजूबाजूला कोणी नसल्याने त्याला वाचता आले नाही. त्याचा बुडून मृत्यू झाला असल्याचे प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. याप्रकरणी अंढेरा पोलीस स्टेशन ठाण्यात आकस्मित येऊन करण्यात आली असून रुग्णवाहिकेने देऊळगाव मही येथे रुग्णालयात शव आणण्यात आले. एकुलत्या एक मुलाच्या मृत्यूमुळे इंगळे परिवारावर शोककळा दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

## कानावर मराठी समजत नसेल तर... राज ठाकरेंचा मराठीद्वेष्ट्यांना थेट इशारा



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१८, मिरारोड :** कानावर मराठी समजत नसेल तर कानाखाली मराठी बसणारच, असा थेट इशारा मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मिरारोडमधून दिला आहे. मराठी भाषेचा आग्रह मनसेच्या कार्यकर्त्यांनी धरला. तेव्हा एका दुकानातील कर्मचाऱ्यानं त्यांच्याशी हुज्जत घातली. त्यावरुन मनसैनिकांनी त्या कर्मचाऱ्याच्या थोबाडीत दिली. त्यानंतर दुकानदार, व्यापाऱ्यांनी मोर्चा काढला. काय गरज होती मोर्चाची? तुमच्या कानशिलात मारली होती? अजून नाही मारलेली, अशा शब्दांत राज यांनी अमराठी व्यापाऱ्यांना इशारा दिला. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री हिंदीसाठी का भांडतोय, असा सवाल राज यांनी उपस्थित केला.

स्वत:हून आम्ही कोणाच्या अंगावर जाणार नाही. पण कोणी मराठीची मुस्कटदाबी करणार असेल. आमच्या अंगावर येणार असेल, तर आम्ही सोडणार नाही, अशा शब्दांत राज यांनी हिंदी सक्ती लादणाऱ्या राज्य सरकारला इशारा दिला. हिंदी सक्ती होऊ देणार नाही. आता फक्त दुकानं बंद झाली आहेत. हिंदी लादण्याचा प्रयत्न केला, तर शाळाही बंद करेन, असा इशारा राज ठाकरेंनी महायुती सरकारला दिला. ते मिरारोडमधील सभेत बोलत होते.

'मुंबई महाराष्ट्राला मिळू नये हे विधान सर्वप्रथम सरदार वल्लभाई पटेल यांनी केलं. मुंबई महाराष्ट्राला देऊ नका, असं म्हणणारे पहिले व्यक्ती पटेल होते. आचार्य अत्रे यांच्या पुस्तकात मी हे वाचलं. ज्यांना आम्ही लोहपुरुष म्हणतो त्यांनी मुंबई महाराष्ट्राला देण्यास विरोध केला? मोरारजी देसाई यांनी गोळीबार करुन मराठी माणसांवर गोळीबार केला होता. गेल्या अनेक वर्षांपासून यांचा मुंबईवर डोळा आहे. हे सहज होत नाहीय. हे तुम्हाला तपासून बघत आहेत की, हिंदी भाषा आणली तर मराठी माणूस पेटतोय का? याची चाचपणी सुरु आहे. इथला मराठी माणूस जर शांत बसला तर हिंदी भाषा आणणं ही त्यांची पहिली पायरी असेल. हळूहळू करुन मुंबई ताब्यात घ्यायची आणि ती गुजरातला जोडायची हे यांचं स्वप्न आहे,' असं राज ठाकरे म्हणाले.

मिरारोडमध्ये २ जुलैला मनसैनिकांनी एका दुकानदाराला मराठीच्या मुद्द्यावरुन मारहाण केली. त्यानंतर तिथल्या स्थानिक दुकानदारांनी ४ जुलैला मोर्चा काढला. तेव्हाचा घटनाक्रम राज यांनी सांगितला. '२ जुलैला मनसैनिकांनी मोर्चा काढला होता. त्यावेळी काही मनसैनिक एका मिठाईच्या दुकानात पाण्याची बाटली विकत घेण्यासाठी गेले. तेव्हा तिथल्या एकानं मोर्चा कशासाठी काढलाय, असं विचारलं. तेव्हा मनसेच्या कार्यकर्त्यांनी त्याला हिंदी सक्तीविरोधात मोर्चा काढल्याचं सांगितलं. त्यावर आम्ही हिंदीतच बोलतो, अशी उर्मट भाषा त्या कर्मचाऱ्यानं वापरली. तेव्हा त्या कर्मचाऱ्याला मनसैनिकांनी चोप दिला,' असं राज ठाकरेंनी सांगितलं.

'मारहाणीनंतर विषय संपला होता. पण त्यानंतर दोन दिवसांनी स्थानिक दुकानदार, व्यापारी रस्त्यावर उतरेल. त्यांनी दुकानं बंद ठेवली. राजकीय पक्षाच्या दबावातून त्यांनी दुकानं बंद केली. मोर्चा काढला. त्यांनी विषय समजून घ्यायला हवा होता. तुमच्या कानफाटात मारली होती का? अजून मारलेलीच नाहीए,' अशा शब्दांत राज यांनी मराठीद्वेष्ट्यांना थेट इशारा दिला. तुम्ही दुकानं बंद करुन किती दिवस राहताय, तेच आम्हाला बघायचंय. इथे शांतपणे राहा. मस्ती नाही करायची. मराठी भाषा शिका. मस्ती करणार असाल, तर दणका बसेल, असा इशारा राज यांनी दिला.

## गोदावरी खोऱ्यातील प्रकल्प बंदी उठवावी : काशिनाथ दाते

### खंडपीठात शासनाने फेर याचिका दाखल करण्याची मागणी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर-नगर मतदारसंघातील ४१ गावांमध्ये जलसंधारण प्रकल्प उभारण्यावर शासनाने आणि न्यायालयाच्या जनहित याचिकेमुळे घातलेली बंदी स्थानिक पातळीवर अन्यायकारक ठरत असून, त्यामुळे २७ हजार हेक्टर शेती क्षेत्र ओलिताखाली येण्याची संधी गमावली जात आहे असे सांगत ही बंदी उठवणे आवश्यक असल्याचा ठाम निर्वाळा त्यांनी दिला. यासाठी औरंगाबाद खंडपीठात शासनाने फेर याचिका दाखल करावी, अशी स्पष्ट मागणी त्यांनी केली.

मतदारसंघातील अनेक शेतकरी विरोधी समस्यांवर आमदार दाते यांनी राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात स्पष्ट भूमिका घेतली. राज्य सरकारच्या विविध योजनांचे स्वागत करत या योजनांची अंमलबजावणी करताना मतदारसंघातील शेतकऱ्यांना भेडसावत असलेल्या गंभीर अडचणींवर त्यांनी संयुक्त प्रस्ताव (नियम २९३) चर्चा अंतर्गत जोरदार प्रहार केला.

प्लास्टिक फुलांच्या अतिरेकी वापरामुळे राज्यातील फुल उत्पादक शेतकऱ्यांचे बाजारभाव पडल्याचे कटू वास्तव विधीमंडळा समोर मांडले. मुंबईच्या आझाद मैदानावर फुल उत्पादक शेतकऱ्यांचा मोर्चा हीच त्यांच्या व्यथा व्यक्त करणारी ठिणगी असून, या पार्श्वभूमीवर शासनाने प्लास्टिक फुलांच्या उत्पादन व वापराबाबत नवीन धोरण आणण्याची गरज असल्याचे अधोरेखित केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेले पारनेरमधील पाच सौर ऊर्जा प्रकल्प वर्षानुवर्षे रखडलेले आहेत. याशिवाय वैयक्तिक शेतकऱ्यांच्या शेतात सौर युनिट बसवण्यास एजन्सीचा अक्षम्य विलंब, आणि विज वितरण कंपनीकडून कनेक्शन टाळण्याचा प्रकार यामुळे शेतकरी आर्थिक व मानसिक त्रास सहन करत आहेत. त्यामुळे शासनाने त्वरित लक्ष घालून मुबलक वीजपुरवठा सुनिश्चित करावा, अशी आग्रही मागणी आमदार दातेंनी केली.

> राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेती व्यवसायाच्या हितासाठी शेतकरी केंद्रस्थानी ठेवून शासनाच्या धोरणांची अंमलबजावणी होत असताना, येणाऱ्या अडचणींवरही मार्ग काढला पाहिजे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, एकनाथ शिंदेंसह मंत्रिमंडळाचे शेतकरी हिताच्या निर्णय घेतल्याबद्दल अभिनंदन.
>
> **- आ. काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

## ...आणि कासवाने शर्यंत पुन्हा जिंकली !



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, पनवेल :** ससा आणि कासव यांच्या शर्यतींची गोष्ट आपणा सर्वांनाच माहिती आहे. अशीच एक महत्वाची म्हणजे जीवन मरणाची शर्यंत आज कासवाने पुन्हा जिंकली असून कासव पुन्हा वडाळे तलावात आपल्या मुक्कामी सुखरूप पोहचले.

या संदर्भातली अधिक माहिती अशी, वडाळे तलाव परिसरात एका कासवाच्या तोंडात गळ अडकल्याची माहिती मुकुंद कोळी यांनी अग्निशमन केंद्राला दिली. अग्निशमन विभागाचे वाहन घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी पोहोचल्यावर अग्निशमन कर्मचाऱ्यांनी पाहिले की, कासवाच्या तोंडात गळ अडकलेला आहे. त्यांनी कासवाला सुरक्षितपणे पनवेल महानगर पालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडे सुपूर्द केले.

महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. मधूलिका लाड व डॉ.भगवान गीते यांनी तात्काळ दखल घेत कार्यवाही केली. तालुका पशू संवर्धन विभागाचे हेमंत तोडकर यांच्या मदतीने त्याच्या तोंडातील गळ भूल देऊन यशस्वीरित्या काढण्यात आला. सदर कासवाची वैद्यकीय तपासणी करून, कोणतीही इजा नसल्याची खात्री झाल्यानंतर वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यास पुन्हा वडाळे तलावात सोडण्यात आले. यावेळी उपायुक्त प्रसेनजीत कारलेकर, सहायक आयुक्त राज्य शासन डॉ.तोडणकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.आनंद गोसावी, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ.राजू पाटोदकर उपस्थित होते.

ही संपूर्ण कारवाई अग्निशमन विभागाच्या सतर्कतेमुळे व पशुवैद्यकीय विभागाच्या सहकार्यामुळे शक्य झाली. या कार्याबद्दल आयुक्त मंगेश चितळे यांनी अग्निशमन विभाग व पशुवैद्यकीय विभागाचे अभिनंदन केले.

## संपादकीय



# धावा, कमी खा, आनंदी रहा दीर्घायुषी बना...

माणसाला स्वतःच्या जीवनात नेमकं काय कमवायचं असतं? या प्रश्नाचं उत्तर व्यक्तिपरत्वे वेगवेगळं मिळतं. कोण म्हणेल बक्कळ पैसा, अफाट जमीन-जुमला, तर कोण म्हणेल सत्ता, प्रसिद्धी, कीर्ती, नाव, इज्जत... त्याही पुढे जाऊन काहीजण असेही म्हणतील की, संचित कर्म, लोकांचा विश्वास, आशीर्वाद, सदिच्छा ह्याच खरी कमाई. पण फारच थोडे लोक असं म्हणतील की, मला दीर्घायुष्य कमवायचं आहे. होय, दीर्घायुष्य कमवावं लागतं. लोक दीर्घायुष्याबाबत वेगवेगळ्या प्रतिक्रिया देतात. काहींना वाटतं – आपल्याच लोकांना नकोसं वाटेल इतकं जगण्यात काय अर्थ आहे? तर काहींचं मत असतं – जोपर्यंत जीवात जीव आहे, तोपर्यंत दीर्घायुषी होण्यासाठी प्रयत्न करायचं आणि आनंदानं जगायचं. आपल्याकडे 'अमृत' ही संकल्पना सांगितली जाते. अमृत पिल्याने माणूस अमर होतो, असं मानलं जातं. त्यासाठी समुद्रमंथन करावं लागतं असं सांगितलं जातं. परंतु आजपर्यंत कोणीही खरं अमृत प्राप्त केल्याचं उदाहरण नाही.याचबरोबर आपण अनेक आख्यायिका ऐकतो – अमुक एका ऋषीनं घोर तपश्चर्या करून अमरत्व प्राप्त केलं. या सगळ्यांवरून हेच लक्षात येतं की, दीर्घायुष्य किंवा अमरत्व मिळवणं हे मानवी जीवनातील सर्वात मोठं यश मानलं जातं. मृत्यू हा अपघात, आजारपण किंवा वृद्धापकाळामुळे येतो. मृत्यू म्हणजेच माणसाचं जैविक आणि भावनिक अस्तित्व संपणं. प्रत्येकाला एक ना एक दिवस हे जग सोडून जायचं आहे, हे जीवनाचं वास्तव आहे. मृत्यू ही सर्वांसाठी अप्रिय गोष्ट आहे. मृत्यूपासून दूर राहण्यासाठी माणूस आयुष्यभर धडपड करत असतो. परंतु काही लोक आपले जीवन असह्य झाल्यामुळे जीवनापेक्षा मृत्यूला जवळ करतात. तरीही, बहुसंख्य लोकांना मृत्यू ही कल्पना दुःखद वाटते. जगण्याचा आनंद, नात्यामधील ओढ, आणि जीवनाची गोडी – हे सर्व मृत्यू संपवून टाकतो. मृत्यूवर लेख लिहिणारे, भाषण करणारे सुद्धा मृत्यूवर प्रेम करू शकत नाहीत.

एकूणच, प्रत्येक माणसाची धडपड ही दीर्घायुष्य मिळवण्याचीच असते. आपण अजून जगलं पाहिजे... अजून जगलं पाहिजे...

ही भावना आजारी व्यक्तीपासून ते धडधाकट व्यक्तीपर्यंत आणि झोपडीत राहणाऱ्या गरीब माणसापासून ते महालात राहणाऱ्या श्रीमंतापर्यंत – सर्वांमध्ये सारखीच असते.हे सारं लिहिण्यामागे एक दुःखद घटना कारणीभूत आहे.

१४ जुलै, सोमवारी ११४ वर्षीय मॅरेथॉन धावपटू फौजा सिंग यांचा जालंधर-पठाणकोट महामार्गावर एका अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला.फौजा सिंग हे टर्बन्ड टोर्नाडो या नावाने प्रसिद्ध होते . ते लंडन ऑलिंपिक २०१२ चे मशालवाहक होते. त्यांचा जन्म पंजाबमधील बियास गावात १ एप्रिल १९११ रोजी झाला. त्यांच्या १०० व्या वाढदिवसाच्या निमित्तानं राणी एलिझाबेथ-द्वितीय यांनी त्यांना खास पत्र पाठवून शुभेच्छा दिल्या होत्या.

विविध वयोगटांतील मॅरेथॉनमध्ये त्यांनी अनेक विक्रम प्रस्थापित केले.


५ फूट ८ इंच उंची आणि ५२ किलो वजन असलेले फौजा सिंग स्वतःच्या दीर्घायुष्यासाठी तंदुरुस्तीला श्रेय देत. त्यांच्या मते, धूम्रपान व मद्यपान न करणे,साधा शाकाहारी आहारआणि सकारात्मक विचार त्यांना तंदुरुस्त ठेवत होता.त्यांच्या आहारात – फुलका, डाळ, हिरव्या भाज्या, दही, दूध, भरपूर पाणी आणि आल्याचा चहा यांचा समावेश होता.

मी पराठे, पकोडे, भात किंवा तळलेले पदार्थ खात नाही. मी माझ्या रब्बाचं नाव घेतो आणि लवकर झोपतो – म्हणजे नकारात्मक विचार मनात येत नाहीत. असं स्पष्ट करून ते म्हणत असत , मी कमी खातो, सतत चालतो आणि नेहमी आनंदी राहतो.

ज्यांना दीर्घायुष्य कमवायचं आहे, त्यांनी फौजा सिंग यांचं जीवन हे मार्गदर्शन म्हणून घ्यावं. रोज ३ ते ५ किमी चालणं किंवा धावणं,फक्त भूक लागल्यानंतरच साधा आहार घेणं,आणि सर्वात महत्त्वाचं – आपल्याकडे जे आहे, त्यात समाधान मानून आनंदानं जगणं.

दीर्घायुष्य म्हणजे फक्त आयुष्याची लांबी नव्हे, तर त्यातला गोडवा, साधेपणा आणि आनंद – हे खरी कमाई असते.

# बहुविध प्रतिभेचे धनी डॉ.जयंत नारळीकर



जगप्रसिद्ध खगोल - भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण डॉ जयंत नारळीकर यांचे आज जयंती. डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस विश्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या.

वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी ) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला राजवाडे ( गणितज्ञ ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत गीता, गिरिजा लीलावती. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञान कथे सारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञाना सारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रयचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला. याच वर्षी २० मे २०२५ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. डॉ जयंत नारळीकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२१५**

## विहंगम् ..

करताना गठ बंधन
युती आघाडी धरम
रहावे जबाबदारीने
महत्वाचे तसे करम

चुकतामागावी क्षमा
मुळी न काही शरम
सुदृढ हो नातीसंबंध
कसला नको संभ्रम

अडचणीच्या समयी
रहावे सदोदित नरम
कधीएकत्र जुळतात
उद्देशअसूनहीविषम

तालस्वरएकालयीत
तेंव्हाचं साधे -हिदम्
एक दुस-याला जपा
कायमराखावे संयम

निसरडा जिथे रस्ता
जपून टाकावे कदम
टोकाची ना भुमिका
काहीनजुळे एकदम

पवित्र बनतात नद्या
जेधवा घडतो संगम
उलटा प्रवाह सुलटा
दृश्येदिसती विहंगम्

जुळवून घेता जरासे
रे नातीसंबंध ऑर्सम
सरळकरतो भल्यास
निवडणूकीचामोसम

**- हेमंत मुसरीफ, पुणे**

# आता देशभरात शिकवला जाणार शिवरायांचा इतिहास...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१८, मुंबई :** एनसीईआरटी बोर्डाने इयत्ता आठवीच्या पुस्तकात मोठे बदल केले आहेत. सामाजिक शास्त्राच्या पुस्तकात मुघल इतिहास नवीन दृष्टिकोनातून मांडण्यात आला आहे. यात सम्राट अकबरला 'निर्दयी पण सहिष्णू' आणि औरंगजेबला 'कठोर धार्मिक शासक' म्हणून चित्रित केले आहे. या पुस्तकात १३ व्या ते १७ व्या शतकातील राजकीय चळवळींचा समावेश करण्यात आला आहे.

बाबर हा 'लोकांची कत्तल करणारा एक क्रूर आणि निर्दयी आक्रमणकर्ता' होता, अकबराची राजवट 'क्रूरता आणि सहिष्णुतेचे मिश्रण' होती, तर औरंगजेबाने मंदिरे आणि गुरुद्वारा उद्ध्वस्त केले, असे वर्णन एनसीआरटीच्या इयत्ता आठवीच्या नवीन सामाजिक शास्त्राच्या पाठ्यपुस्तकात करण्यात आले आहे. दिल्ली सल्तनत आणि मुघल काळाची विद्यार्थ्यांना ओळख करून देणाऱ्या या पुस्तकात, त्या काळात 'धार्मिक असहिष्णुतेच्या अनेक घटना' घडल्याचे नमूद करण्यात आले आहे.



पुस्तकात दिल्ली सल्तनत व मुघल काळातील धार्मिक असहिष्णुतेची उदाहरणे दिली आहेत. बाबरला क्रूर राजा, तर अकबराचे सहिष्णुता आणि क्रूरतेचे मिश्रण असे वर्णन केले आहे. औरंगजेबाला मंदिरे व गुरुद्वारांचा विध्वंसक असं म्हटलं आहे.

पुस्तकांमध्ये बदल झाल्यानंतर वाद निर्माण होऊ शकतो. हे टाळण्यासाठी एनसीईआरटीने म्हटले आहे की, 'भूतकाळातील घटनांसाठी आज कोणालाही दोषी ठरवू नये,' म्हणून हे बदल करण्यात आले आहेत.

दरम्यान एनसीईआरटीने गेल्या वर्षी पुस्तकांमध्ये काही बदल केले होते. अभ्यासक्रमात 'राष्ट्रीय युद्ध स्मारक' समाविष्ट केले होते. यासोबतच शालेय पुस्तकांमध्ये वीर अब्दुल हमीद यांच्यावरील एक प्रकरण समाविष्ट केले होते.

एनसीईआरटीच्या पुस्तकांमधील धडे आणि माहितीवरुन यापूर्वीही अनेकदा वाद निर्माण झाले आहेत. विरोधकांनी राष्ट्रीय स्तरावर राबवल्या जाणाऱ्या राष्ट्रीय शिक्षण धोरणावर निशाणा साधताना हे शिक्षणाचं भगवीकरण असल्याचा आरोप केला होता. नव्या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून भारतीय इतिहासातील खऱ्या नेतृत्वांना मुलांपर्यंत सरकारचे प्रयत्न असल्याचं सांगितलं जातं.

तसेच एनसीईआरटीच्या पुस्तकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठ्यांच्या इतिहासाचे गौरवपूर्ण वर्णन केले आहे. त्यामुळे आता या पुस्तकांच्या माध्यमातून शिवरायांचा इतिहास महाराष्ट्राबाहेरील मुलांनाही शिकता येणार आहे.महाराष्ट्राच्या दृष्टीने ही अत्यंत अभिमानाची आणि गर्वाची बाब आहे.

# प्रवासी ऑटो झाला पलटी ; २ जखमी, १ गंभीर

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१८, नांदेड :** नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील पिंपळगाव (म.) पाटीजवळ प्रवासी ऑटो पलटी झाला. या अपघातात दोन जण जखमी झाले असून यापैकी एक जण गंभीर झाला आहे. हा अपघात गुरुवारी मध्यरात्री नंतर घडला. अपघातानंतर जखमींना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, नांदेड-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील पिंपळगाव (म.) पाटीजवळ अप्पे ऑटो क्रं. एम. एच. - २६ - टी.



- ९५५५ हा नांदेड़ कडून हिंगोली कड़े जात असतांना चालकांचा ताबा सुटून प्रवाशी ऑटो पलटी झाला. यात ऑटो मधील विलास आनंदा जाधव वय ३० वर्षे रा. तळणी ता. बिलोली जि. नांदेड व शिवराज गोपीनाथ मुंके वय २९ वर्षे रा. तळणी ता. बिलोली जि. नांदेड हे दोघे जखमी झाले. यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे.

या अपघाताची माहीती मिळताच भोकर फाटा येथे मुक्कामी उभी असलेल्या जगद्गुरु नरेंद्रचार्य संस्थानच्या रुग्णवाहिकेचे चालक राजु केशवराव पाचंगे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन जखमींना विष्णुपूरी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे.

# धाराशिव जिल्ह्यात सराफ व्यापाऱ्यांवर चोरीचे सत्र ; पोलिस अधीक्षकांना निवेदन

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१८, धाराशिव :** धाराशिव जिल्ह्यात अलीकडच्या काही दिवसांत सराफ व सुवर्णकार व्यावसायिकांच्या दुकानांवर चोरीचे व फोडाफोडीचे प्रकार घडल्याने व्यवसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर धाराशिव सराफ व सुवर्णकार फेडरेशन असोसिएशनने जिल्हा पोलिस अधीक्षक यांना निवेदन देत या घटनांची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

दि. ०३ जुलै २०२५ रोजी धाराशिव शहरात पहाटेच्या सुमारास काही सराफी दुकाने फोडण्याचा प्रयत्न झाला होता. त्यानंतर १५ जुलै रोजी लोहारा शहरातील जयलक्ष्मी माऊली सराफ



दुकानाचे शटर तोडून अज्ञात चोरट्यांनी चांदीच्या वस्तू चोरून नेल्या. तसेच आष्टा कासार गावातही भाग्यश्री अलंकार नावाचे दुकान फोडल्याची घटना उघडकीस आली.

या घटनांमुळे व्यापाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे पोलिस प्रशासनाने या प्रकरणांमध्ये गांभीर्याने लक्ष घालून दोषींना तात्काळ अटक करावी व भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदन देताना धाराशिव सराफ व सुवर्णकार फेडरेशन असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ताजी माळी, कार्यकारी अध्यक्ष कृष्णाजी डहाळे, जिल्हा समन्वय समितीचे अध्यक्ष तानाजी मुंडे, जिल्हा संघटक कृष्णाजी नाईकनवरे, संयोजक राजेश कदम, सचिव मयुर जालनेकर, कोषाध्यक्ष सच्चिदानंद पोद्दार, तसेच आनंद माळी, संतोष खरमाटे, शशिकांत सानप, योगेश शहाणे, प्रवीण माळी, अतुल माळी, स्वप्नील भालेकर, गणेश टेहरे, सौदागर माळी व इतर व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फेडरेशनच्या वतीने पोलिस प्रशासनाशी रचना, संवाद व सहकार्य राखत व्यापाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी जलसिंचन क्षमता वाढविणार - ना. विखे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, अहिल्यानगर :** महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागामध्ये जलसिंचनाची क्षमता वाढवण्यासाठी शासन गंभीर असून त्यासाठी महत्त्वाची पावले उचलण्यात येत आहेत, असे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी विधान परिषदेत स्पष्ट केले. सदस्य रणजितसिंह मोहिते पाटील यांनी अर्धा तास चर्चेत वाढत्या पाण्याची मागणी पूर्ण करण्याची सूचना केली होती, त्यावेळी मंत्री विखे पाटील यांनी माहिती दिली. विखे पाटील म्हणाले, कृष्णा मराठवाडा प्रकल्पासाठी अंदाजे २१ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. यासाठी ११५ टीएमसी पाण्याच्या फेरजल नियोजनाचा निर्णय घेण्यात आला आहे. यासोबतच उजनी धरणातून २३.७ टीएमसी पाणी धाराशिव जिल्ह्यात वळवले जाणार आहे. या भागातील काही तालुक्यांमध्ये उपसा सिंचनाद्वारे पाणी पुरवठा केला जाईल.

या प्रकल्पासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र रेसिलियन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम राबवण्यात येत आहे. फ्लड डायव्हर्जन ही यामधील मुख्य योजना असून १३ मार्च २०२४ रोजी त्याला मान्यता देण्यात आली आहे. दोन महिन्यांच्या कालावधीत पुराच्या पाण्याचा उपयुक्त वापर होईल, असे त्यांनी सांगितले. प्रकल्पाचा सर्वेक्षण अहवाल लवकरच अपेक्षित असून पुढील पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. कृष्णा खोर्यातून भीमा खोर्यात सुमारे ५५ टीएमसी पाणी आणण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सर्व्हेक्षण झाल्यानंतर वस्तुस्थिती सादर करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांच्या प्रकल्पावर सुमारे ४ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे, परंतु जागतिक बँकेच्या निधीमुळे आता अडथळा उरलेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले यावर्षी प्रकल्पाच्या निविदा निघतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच उजनी, जायकवाडी, कोयना आदी धरणांमधील गाळ काढण्यासाठी नवीन धोरण तयार करण्यात येत आहे. हे धोरण लवकरच मंत्रिमंडळासमोर मांडण्यात येणार असून मान्यता मिळवण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे ना. विखे पाटील यांनी सांगितले.

## कांदिवली येथे बौद्धिक अक्षम व्यक्तींसाठी राष्ट्रीय जलतरण स्पर्धेचे आयोजन

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.१८, मुंबई :** स्पेशल ओलंपिक भारत, (महाराष्ट्र चॅप्टर) या संस्थेच्या वतीने दिनांक ३ ते ६ ऑगस्ट २०२५ या कालावधी दरम्यान बौद्धिक अक्षम खेळाडूंसाठी राष्ट्रीय जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा कांदिवली येथील सरदार वल्लभभाई पटेल जलतरण तलाव येथे संपन्न होणार आहे. ही स्पर्धा तीन गटात समाविष्ट असून यात १४ वर्षाखालील गट, १४ ते १७ वर्ष असलेला गट आणि १७ वर्षा पासून पुढील वयोगटातील खेळाडू साठी असणार आहे. यामध्ये देशभरातून ३५० हून अधिक खेळाडू सहभागी होणार आहेत. स्पेशल ओलंपिक्स भारत ही संस्था गेली अनेक वर्षापासून बौद्धिक अक्षम मुला-मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा व आरोग्य विषयक उपक्रमाद्वारे कार्यरत असून या संस्थेमार्फत अनेक खेळाडू आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाले असून अनेक नामांकित पदके मिळवली आहेत. ऑलम्पिक सारख्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी तयारी व अनुभव मिळावा. या उद्देशाने या जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजकांनी सांगितले. डॉक्टर मेधा सोमय्या अध्यक्षा, डॉक्टर भगवान तलवारे क्षेत्र संचालक, जितेंद्र ढोले स्पोर्ट्स डायरेक्टर, भारती मराठे कार्यक्रम अधिकारी, सुनील आडे कॅम्प इन्चार्ज, समन्वयक भाग्यश्री वर्तक, विनोद चाळक, अनुराधा जठार यांच्यासह सर्व एसओबी एक्सपर्टस व टीम मेंबर्स या स्पर्धेसाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत. या स्पर्धेसाठी संस्थेच्या अध्यक्षा मल्लिका नड्डा, केंद्रीय मंत्री पियुष गोयल तसेच महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## कंत्राटदार किसनराव अढाऊ यांचे निधन



**अक्षराज : दिवाकर घेर,**

**दि.१८, नागपूर :** खापरखेडा निवासी कंत्राटदार व खापरखेडा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे पदाधिकारी श्री.महेश अढाऊ यांचे वडील किसनराव महादेव अढाऊ यांचे आज सायंकाळी ५ वाजता त्यांच्या खापरी येथील राहत्या घरी दीर्घ आजाराने निधन झाले. ते ८२ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना व नातवंड असा मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर १९ जुलै रोजी सकाळी ११ वाजता कोलार घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

## राजाराम नामदेव खांडके यांचे निधन



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१७, पाटण (सातारा) :** पाटण मुख्य बाजारपेठ येथील राजाराम नामदेव खांडके यांचे गुरुवार, दिनांक १७ जुलै २०२५ रोजी रात्री ८ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्यावर शुक्रवार, दिनांक १८ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ वाजता स्मशानभूमी पाटण येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

मृत्यू समय त्यांचं वय ९० वर्ष होतं. संजय, खांडके यांचे ते वडील होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई, मुलगा, सुन, नातवंडे असा मोठा परिवार आहे. राजाराम नामदेव खांडके पाटण येथील शिवाजी उदय मंडळाचे ज्येष्ठ सदस्य होते. रक्षाविसर्जन रविवार, दिनांक २० जुलै २०२५ रोजी सकाळी ९ वाजता पाटण येथील स्मशानभूमी येथे होणार आहे.

# खा. धानोरकर यांच्याकडून बीएसएनएल ला 'अच्छे दिन' आणण्याचे निर्देश

## जिल्ह्यातील ग्रामीण भागात सेवा आणि सुविधा पोहचवा - खा. धानोरकर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. १८ , चंद्रपूर :** जिल्ह्यात भारत संचार निगम लिमिटेड (बीएसएनएल) च्या सेवांचा आढावा घेण्यासाठी दूरसंचार सल्लागार समितीची बैठक खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीत बीएसएनएलच्या सध्याच्या स्थितीवर चिंता व्यक्त करत, जिल्ह्यातील प्रत्येक गावात मोबाइल सेवा आणि ब्रॉडबँड सुविधा पोहोचवण्यावर भर देऊन बीएसएनएलला 'अच्छे दिन' आणण्याचे निर्देश खासदार प्रतिभा धानोरकर यांनी दिले. खासदार प्रतिभा धानोरकर यांनी कर्मचाऱ्यांनी केवळ नोकरी म्हणून न पाहता जनसेवा व बीएसएनएल ला परिवार मानून काम केल्यास निश्चित चित्र बदलेल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. ग्रामीण भागात ऑनलाइन कामांची वाढती गरज लक्षात घेऊन अविरत इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देण्यासंबंधात चर्चा करून अधिकाऱ्यांना सेवा सुधारण्याच्या सूचना दिल्या.




यावेळी बीएसएनएलचे वरिष्ठ महाप्रबंधक प्रांजल ठाकूर, उपमहाप्रबंधक मुख्यालय एन. एम. टेंगशे, उपमहाप्रबंधक ऑपरेशन डी. जी. घोंगडे, मुख्य लेखा अधिकारी काजल डे. तसेच दूरसंचार सल्लागार समितीचे सदस्य पांडुरंग आगलावे, देविदास सातपुते, ताजुद्दीन शेख, पवन मेश्राम यांची उपस्थिती होती. बैठकीत बीएसएनएलच्या अनेक समस्यांवर चर्चा झाली, ज्यात पावसाळ्यात सेवा विस्कळीत होणे, खोदकामामुळे तारा तुटून सेवा खंडित होणे आणि काही ठिकाणी बँकांमधील सेवा ठप्प होणे या प्रमुख समस्या होत्या. विसापूर येथील बीएसएनएल टॉवर सतत बंद असल्याबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केली आणि तात्काळ उपाययोजनांची मागणी केली. तसेच जिवती तालुक्यातील बीएसएनएल सेवे संदर्भात चिंता व्यक्त करीत सेवेत सुधारणा करण्याच्या सूचना केल्या. यावेळी ४जी सेवा संपूर्ण जिल्ह्यात लवकरच पूर्णपणे सुरू करावी आणि ५जी कडे वाटचाल करणाऱ्या खाजगी कंपन्यांशी स्पर्धा करण्यासाठी बीएसएनएलने आपल्या सेवांची गुणवत्ता सुधारण्यावर लक्ष केंद्रित करावे, असेही खासदार प्रतिभा धानोरकर यांनी सांगितले. भारत नेट आणि महानेट-१ प्रकल्पांचा प्रभावीपणे वापर करून ग्रामपंचायतींपर्यंत पोहोचलेल्या फायबर कनेक्शनचा पूर्ण उपयोग व्हावा यासाठी लोकांना डिजिटल साक्षर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. यावेळी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी जुनी उपकरणे तात्काळ बदलून प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून दर्जेदार सेवा पुरवण्यासाठी युद्धपातळीवर काम करण्याचे निर्देश दिले.

# १०० टक्के कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने नियोजन करा : जिल्हाधिकारी विनय गौडा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, चंद्रपूर :** जिल्हा नियोजन समितीमार्फत जिल्ह्यातील विविध विकासकामे प्रभावीपणे राबविली जातात. प्रत्येक विभागाने जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्राप्त निधीतून मंजूर सर्व कामे १०० टक्के पूर्ण होतील, या दृष्टीने नियोजन करावे, अशा सुचना जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज (दि.१७) दिले. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन सभागृहात आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठक ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग, मुख्य वनसंरक्षक रामानुजम, ताडोबा अंधारी प्रकल्पाचे उपसंचालक आनंद रेड्डी, अतिरिक्त पोलिस अधीक्षक ईश्वर कातकाडे, उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, जिल्हा नियोजन अधिकारी संजय कडू, तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान



जिल्हाधिकारी गौडा पुढे म्हणाले, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विविध शासकीय बांधकामे राबविण्यात येत असून ती कामे नियोजित वेळेत पूर्ण व्हावीत. कंत्राटदारांकडून कामात दिरंगाई अथवा दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास त्यांच्याकडून दंड वसूल करावा. मागील वर्षी प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांकरिता अद्याप वितरीत न झालेला निधी लक्षात घेऊन दायित्व निधी मागणीसाठी तात्काळ प्रस्ताव सादर करावा. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये पिण्याचे पाणी, स्वच्छ प्रसाधनगृहे, महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे इत्यादी आवश्यक मूलभूत सुविधांकरिता सार्वजनिक बांधकाम विभागास प्रस्ताव सादर करावेत. जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये साधनसामग्री व औषधांचा पुरवठा नियमित व्हावा, यासाठी कार्यवाही करावी. तसेच जिल्हा परिषदेअंतर्गत शाळांची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत प्रस्ताव सादर करावेत.

शासनाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांमध्ये ऑनग्रीड सोलर सिस्टीम बसविण्यात यावी. या कामाचा प्रारंभ जिल्हास्तरावरून करण्यात यावा व योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त कार्यालयांचा ऑन-ग्रीड सोलर सिस्टमचा समावेश करण्यात यावा. गडकिल्ल्यांचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास, गडकिल्ल्यांचे संरक्षण व पर्यटन विकासासाठी मास्टर प्लॅन तयार करून त्यानुसार जिल्हा वार्षिक योजनेतून कामे पूर्ण करावीत. आगामी काळात निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव त्वरीत सादर करावेत, जेणेकरून विकास कामे निवडणुकीपूर्वी पूर्ण करता येतील. जिल्हा नियोजन समि तीमार्फत मंजूर होणारी प्रत्येक योजना ही लोकहिताची आहे. त्यामुळे तिची गुणवत्ता राखणे ही संबंधित विभागांची जबाबदारी आहे. याबाबत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# ताजबाग शरीफ येथील १०३ वा सालांना उर्स निमित्त आज निघणार शाही संदल

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१८, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील वाकी येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हजरत बाबा ताजुद्दीन औलिया ताजबाग शरीफ यांच्या १०३ वा वार्षिक उर्स निमित्त बाबा ताजुद्दीन दर्गा वाकी ट्रस्टच्या वतीने १९ जुलै २०२५ शनिवार ला शाही संदल निघणार असल्याची माहिती संत ताजुद्दीन बाबा वाकी ट्रस्ट च्या वतीने देण्यात आली. १९ जुलै शनिवारला वाकी सकाळी दरबारातून शाही संदल निघून नागपूर येथील छोटा ताजबाग ( सक्करदरा ) येथील स्थित अन्नक्षेत्रामध्ये १२.३० वाजता पोहोचेल तेथे कव्वाली व महाप्रसाद होऊन शाही संदल २.०० वाजता ताजबाग शरीफ कडे रवाना होणार असून सर्व भक्तांनी या शाही संदल मध्ये उपस्थित राहून बाबांचा आशीर्वाद घ्यावा, असे आव्हान ट्रस्टचे अध्यक्ष तथा सज्जादा नशिन प्रभाकरजी डहाके पाटील यांनी केले.



# पोलिसांच्या तत्परतेने ५ तासातच मोटारसायकल चोर पोलिसांच्या जाळ्यात

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१८, विंचूर (नाशिक) :** येथे घरासमोर उभी केलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने लॉक तोडून चोरून नेली, मात्र लासलगाव पोलिसांनी तत्परता दाखवत सूत्र हलविल्याने अवघ्या पाचच तासात मोटारसायकल सह आरोपीला अटक करण्यात यश मिळवले.

दि.१६ जुलै रोजी रात्री ९.३० ते १७ जुलैच्या सकाळी ८ वाजेच्या दरम्यान मेघन दिगंबर ताम्हाणे यांच्या मालकीची काळ्या रंगाची हिरो एच.एफ. डिलक्स ही मोटारसायकल व वाकद येथील आकाश दीपक खांडरे यांच्या म लकीची हिरो स्प्लेंडर अंदाजे किंमत एकूण ४५ हजार रुपयांच्या दोन मोटारसायकली घरासमोरून चोरीस गेल्या. याप्रकरणी लासलगाव



पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी स.पो.नि.भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने सूत्र हलवत नाकाबंदी केली. तपासा दरम्यान पो.ना.औदुंबर मुरडनर यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, सागर भाऊराव बर्डे (वय ३२) रा. दर्डे, ता. कोपरगाव या संशयितास ताब्यात घेण्यात आले. त्यास विश्वासात घेऊन विचारणा केली असता त्याने गुन्ह्यातील एच.एफ डिलक्स मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी करून कायदेशीर अटकेची कारवाई करण्यात आली.

सदर मोटारसायकल चोर हा सराईत आहे किंवा नाही, त्याच्याकडे अधिक मुद्देमाल मिळून येतो का? याबाबत स.पो.नि.भास्करराव शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पो.ना.औदुंबर मुरडनर व संदीप शिंदे अधिक तपास करीत आहेत.

# अक्षराज




## सुपा टोलनाका म्हणजे जनतेसह शासनाचीही लूट; आ.दातेंची विधानसभेत लक्षवेधी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, अहिल्यानगर :** नगर - पुणे महामार्गावरील सुपा टोलनाका येथून गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेली चेतक इंटरप्रायजेस कंपनीची टोलवसुली म्हणजे जनतेची व शासनाची लूटच आहे, असा घणाघात पारनेरचे आमदार काशिनाथ दाते यांनी दिनांक १७ जुलै २०२५ रोजी विधानभवनात केला.

औचित्याच्या मुद्द्यावरून बोलताना त्यांनी टोल व्यवस्थापनातील गंभीर अपहार, नियमभंग व सार्वजनिक सुरक्षेच्या दुर्लक्ष याबाबत सविस्तरपणे मुद्देसूद माहिती सादर केली.

आमदार दाते म्हणाले, १३२ कोटींच्या कामासाठी ७०० कोटींची




टोलवसुली म्हणजे सरळसरळ लूट असून शासनाने याची तातडीने चौकशी करून दोषींना शिक्षा केली पाहिजे. चेतक इंटरप्रायजेसने शासकीय नियम

> चेतक इंटरप्रायजेस कंपनीची टोलवसुली वर शासकीय अधिकाऱ्यांनी जाणिवपूर्वक डोळेझाक केली असून त्यांची भूमिका ही संशयास्पद वाटते, यामध्ये फक्त कंपनीच नव्हे, तर तिला पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्यात यावी.
>
> **आमदार काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

व अटींचे वारंवार उल्लंघन केले असून, निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांमुळे नागरिकांचे प्राण ही धोक्यात आल्याचे निदर्शनास आणले.

या रस्त्यावर अपघातांचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढले असून अपघातग्रस्तांना तातडीची मदत मिळत नाही. रस्त्यावर आवश्यक असणारी सेवा ॲम्ब्युलन्स, क्रेन, मदत यंत्रणा यांचा पूर्ण अभाव आहे. याशिवाय ४० मिमी जाडीचं आवरण व वृक्षलागवडीसारख्या पर्यावरणीय बाबींना कंपनीने पूर्णतः दुर्लक्ष केले आहे.

जनतेच्या पैशाची लूट, जीवांच्या सुरक्षेचा खेळ आणि अधिकाऱ्यांची वाढलेली मुजोरी याविरोधात आमदार दातेंनी घेतलेल्या ठाम पवित्र्यामुळे आता या प्रकरणात काय निर्णय होतो याकडे पारनेर-नगर मतदारसंघासह संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## मंद्रूप सह परिसरात मुसळधार पाऊस; बळीराजा आनंदीत

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.१८, सोलापूर :** मे महिन्यात अवकाळी पावसाने दमदार हजेरी लावल्यानंतर बळीराजांने पावसाच्या भरवशावर खरीप हंगामातील पिकांची पेरणी केली. मात्र भरवशाची रोहीणी, मृग व आद्रा नक्षत्रे वाया गेल्यानंतर बळीराजा हवालदिल बनला होता.

दीड महिन्यांच्या विश्रांतीनंतर अखेर पुनर्वसू नक्षत्राच्या पावसाने दिनांक १७ जुलै २०२५ रोजी दमदार हजेरी लावल्याने बळिराजांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

मंद्रुप, भंडारकवठे, कंदलगाव, निंबर्गी, बसवनगर, हत्तूर, वडकबाळ, वांगी, मनगोळी, माळकवठे, औराद यासह इतर काही गावात पावासने हजेरी लावल्याचे दिसून आले. यावर्षी अवकाळी पावसाने अनेकांचे अंदाज चुकवत १५ मे पासून ३० मेपर्यंत हजेरी लावली. अनेक शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व



मशागत केली नसल्यानेशेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त करण्यात येत होती. मात्र जून महिन्यापासून पावसाने विश्रांती घेतली. त्यामुळे खरीप हंगामातील तूर, मूग, मटकी, बाजरी, मका, सोयाबीन, उडीद यासह इतर पिकांची पेरणी केली.

पेरणी केल्यानंतर मात्र पावसाने पाठ फिरविली. त्यामुळे शेतकऱ्यांची भरवशाची रोहिणी, मृग व आद्रा नक्षत्रे वाया गेल्याने शेतकऱ्यांच्या नजरा

> **पुनर्वसू नक्षत्राच्या पावसाने पिकांना जीवदान**
>
> दीड महिन्यांच्या विश्रांतीनंतर दिनांक १७ जुलै २०२५ रोजी रात्री पुनर्वसू नक्षत्राचा जोरदार पाऊस बरसला. त्यामुळे खरीप हंगामातील तूर, मूग, उडीद, मका व बाजरी यासह इतर पिकांना जीवदान मिळणार आहे. शिवाय दुबार पेरणीचे संकट ही टळणार आहे. पुनर्वसू नक्षत्राच्या पावसाने पिकांच्या उत्पन्नाची हमी निर्माण झाली आहे.
>
> **(अमसिध्द बोराळे, शेतकरी मंद्रुप)**
>
> **भुईमूग पेरणीस होणार सुरुवात**
>
> पुनर्वसू नक्षत्राच्या पावसाने खरीप हंगामातील पिकांना जीवदान मिळणार आहे. पुष्य नक्षत्रामध्ये भूईमूग पेरणी करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण होणार आहे. त्यामुळे भूईमूगाची पेरणी करण्यास मदत होणार.
>
> **(चंद्रकांत कुंभार, शेतकरी टाकळी.)**

आभाळाकडे लागले होते. पेरणी केलेली पिके पावसाअभावी करपून जात असल्याने दुबार पेरणीची शक्यता वर्तविण्यात येत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडण्याची भीती व्यक्त करण्यात येत होती.

अखेर वरूणराजा प्रसन्न होऊन पुनर्वसू नक्षत्राने शेवटच्या टप्प्यात दमदार हजेरी लावत बरसला. त्यामुळे पिकांना जीवदान मिळणार आहे. शिवाय जनावरांच्या चारा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. त्यामुळे पुनर्वसू नक्षत्राने बळीराजानमध्ये आनंद निर्माण केला आहे.

## खाजगी शिकवणीवालेच गेले एकमेकांच्या विरोधात...

**अक्षराज : लक्ष्मण शेन्नेवाड**

**दि.१८, हिमायतनगर (नांदेड) :** शहरामध्ये अनधिकृतपणे चालणारे खाजगी शिकवणी, इंग्लिश स्कूल यांचा सुळसुळाट झालेला असून अनेक वर्तमानपत्रात तशा बातम्या आल्याने हे प्रकरण तापलेले असताना अचानक खाजगी शिकवणीवालेच एकमेकांच्या विरोधात गेलेले पाहायला मिळाले.

> **राजा भगीरथ महाविद्यालयातील प्रा.मिरजगावे, प्रा.सूर्यवंशी घेत आहेत अवैध शिकवणी वर्ग**
>
> शहरात अनधिकृत क्लासेस, अनधिकृत इंग्लिश स्कूल हा मुद्दा पेटलेला असतानाच हिमायतनगर तालुक्यातील राजा भगीरथ महाविद्यालयातील प्रा.मिरजगावे, प्रा.सूर्यवंशी हे दोन शिक्षक सर्रासपणे विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकल गुणाचा धाक दाखवून तसेच इतर प्रलोभन देऊन स्वतःच्या वर्गातील विद्यार्थ्यांना स्वतःच्या घरी बोलावून अवैध शिकवणी वर्ग घेत आहेत. शासनाच्या नियमाचे राजरोसपणे उल्लंघन करीत आहेत. महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवेच्या शर्यती विनीमय अधिनियम १९७७ मधील कलम ४(५), महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी सेवेच्या शर्ती १९८१ मधील नियम २३ मधील तरतुदी व आरटीई ॲक्ट २००९ कलम २८ यांचा संदर्भ देत कोचिंग क्लासेस टीचर्स फेडरेशन अँड सोशल फोरम ऑफ महाराष्ट्र या संघटनेच्या हिमायतनगर तालुका शाखेतर्फे या शासकीय अनुदानित विनाअनुदानित महाविद्यालयातील अवैध शिकवणी घेणाऱ्या शिक्षकावर त्वरित कारवाई करा असे निवेदन गटशिक्षणाधिकारी हिमायतनगर यांना देण्यात आले आहे.

सविस्तर असे की, हिमायतनगर शहरात एकलव्य स्टडी सर्कल या कोचिंग क्लासेसने क्लासेसच्या नावाखाली कुसुम हायटेक इंग्लिश स्कूल ही अनधिकृतपणे मान्यता नसलेली इंग्लिश स्कूल व ज्ञानसाधना कोचिंग क्लासेस नवोदयच्या नावाखाली ९ ते ५ वेळेत शिकवणी वर्ग घेतात. या खासगी शिकवणी वर्ग, इंग्लिश स्कूलमुळे इतर शिकवणी वर्ग वाल्यांची नाहक बदनामी होत आहे. असा आरोप करत गटशिक्षणाधिकारी यांना हमीपत्र देत प्रगती कोचिंग क्लासेस, स्टार कोचिंग क्लासेस, आर.एम.कोचिंग इन्स्टिट्यूट, गंगाई कोचिंग क्लासेस यांनी वरील अनधिकृतपणे चालणाऱ्या कोचिंग क्लासेसची तपासणी करून कारवाई करा अशी मागणी केली आहे.

याबाबत अधिकची माहिती घेण्यासाठी आमच्या प्रतिनिधींनी गंगाई कोचिंग क्लासेसचे संचालक संदीप हरडफकर, आर.एम.कोचिंग इन्स्टिट्यूटचे राम बोलपेलवाड, प्रगती कोचिंग क्लासेसचे मिर्झा, नागेश कोथळकर यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, एन.टी. यांचे कुसुम हायटेक इंग्लिश स्कूल व ज्ञानसाधना कोचिंग क्लासेस हे विद्यार्थ्यांच्या पालकांकडून २० ते २४ हजार रुपये फी आकारून त्यांची आर्थिक लूट करत आहेत.

शालेय वेळेतच आपले क्लासेस व शाळा भरवून त्यांच्या शाळेतल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश तथा टी.सी. जिल्हा परिषद शाळा तसेच इतर मान्यता प्राप्त खाजगी शाळांमध्ये ठेवत आहेत. फक्त शिकवणीसाठी त्यांच्याकडे विद्यार्थी हजर राहतात. यामुळे ते स्वतः शासनाची दिशाभूल करत आहेत.

या अनधिकृत क्लासमुळे आमच्यासारख्या क्लासेसची विनाकारण बदनामी होत आहे असे त्यांनी सांगितले. हमीपत्रामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, आम्ही खाली सह्या करणारे सर्व कोचिंग क्लासेसचे संचालक व शिक्षक हमी पत्राद्वारे हमी देतो की, आम्ही सर्वजण कोचिंग क्लासेसच्या माध्यमातून ज्ञानदानाचे कार्य करीत आहोत पण हिमायतनगर शहरात एकलव्य स्टडी सर्कल या कोचिंग क्लासेसने क्लासेसच्या नावाखाली कुसुम हायटेक इंग्लिश स्कूल ही अनधिकृत मान्यता नसणारी शाळा सुरू केली आहे.

ज्ञानसाधना कोचिंग क्लासेस नवोदयच्या नावाखाली सकाळी ९ ते ५ या वेळेत शिकवणी घेत आहेत. या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या टी. सी. जिल्हा परिषद शाळेत तसेच शासन मान्यता प्राप्त संस्थेत आहेत. मागील आठवड्यात अनेक वर्तमानपत्रात कोचिंग क्लासेसच्या नावाने अनधिकृत शाळा या शीर्षकाखाली बातम्या आल्या आहेत. यामुळे आमच्या कोचिंग क्लासेसची बदनामी होत आहे तरी आम्ही सर्वजन मे. साहेबांना हमी पत्राद्वारे अशी हमी देतो की, आम्ही शासनमान्य शाळांच्या वेळेनंतर क्लास घेत आहोत. तशी आपण आमच्या क्लासेसला भेट देऊन चौकशी करू शकता.

जे कोचिंग क्लासेसच्या नावाने अनधिकृत शाळा चालवत आहेत. त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करून नियमाचे पालन करून जे क्लासेस घेत आहेत. त्या कोचिंग क्लासेसची बदनामी थांबवावी. असे गंगाई कोचिंग क्लासेस, आर एम.कोचिंग इन्स्टिट्यूट, प्रगती कोचिंग क्लासेस, स्टार कोचिंग क्लासेस यांनी हमी पत्रात नमूद केलेले आहे.

## मुदखेड भाजपा शहर कार्यकारिणी जाहीर

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१७, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड येथे नुकतेच शहरातील शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषद घेऊन भाजपा शहर कार्यकारणीची निवड जाहीर करण्यात आली.

प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकरावजी चव्हाण व भोकर विधानसभेच्या आमदार ॲड.श्रीजया चव्हाण व भाजपा नांदेड उत्तरचे जिल्हाध्यक्ष ॲड.किशोर देशमुख यांच्या सूचनेनुसार शहर मंडल अध्यक्ष मुदखेड रामसिंग चव्हाण यांनी भाजपा शहर कार्यकारणी जाहीर केली व नवीन कार्यकारिणीला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यकारणीमध्ये शहर उपाध्यक्ष म्हणून गजानन कमळे, राहुल चिंतेवाड, मधुकर दवणे, उत्तम गिरी, जयश्री देशमुख, प्रियंका सूर्यवंशी, सरचिटणीस विनोद चंद्रे, प्रभाकर पांचाळ, चिटणीस राजू बारतोंडे, सुधाकर सूर्यवंशी, शैलेश बोडके, दैवशाला पांचाळ, संगीता गिरी, कोषाध्यक्ष कालिदास जंगिलवाड, युवा मोर्चा शहराध्यक्ष राम आबादार, महिला मोर्चा शहराध्यक्ष प्रियंका कंधारे, ओबीसी मोर्चा शहराध्यक्ष संतोष सावंत, अनुसूचित जाती कुणाल चौदंते, अनुसूचित जमाती संदीप मोडवान, किसान मोर्चा पृथ्वीराज चौधरी, अल्पसंख्यांक मोहम्मद वसीम, सोशल मीडिया जयदीप चंद्रे, यांच्यासह कार्यकारिणी सदस्यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी भाजपाचे संजय आऊलवार, भाजपाचे माजी शहराध्यक्ष संजय सोनटक्के, चांदु बोकेफोड, प्रविण काचावार, प्रकाश बल्फेवाड, संजय चव्हाण, ऋषीकेश पारवेकर, जय राजवाडीकर, रतन चौदंते, पिटु बोडके, शिवा तोटेवार यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार संजय कोलते यांनी केले

# थोडक्यात

## धोकादायक झाड तोडण्यासाठी परवानगीची मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**




**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल हॉटेल व्यावसायीक रावसाहेब गणपत रांधवण यांनी धोकादायक विलायती चिंचेचे झाड तोडण्यासाठी परवानगी प्रशासनाकडे मागितली आहे. रांधवण यांच्या हॉटेल शेजारी असलेल्या जुन्या जिर्ण झालेल्या धोकादायक विलायती चिंचेच्या झाडाचा कल हॉटेलसमोरील रस्त्यावर व हॉटेलच्या पत्र्यावर झाला असून, कोणतीही क्षणी ते झाड कोसळून जिवितहानी होण्याची शक्यता आहे. रांधवण यांनी ग्रामपंचायत टाकळी ढोकेश्वर व सामाजिक वनीकरण यांच्याकडे सादर केलेल्या अर्जात नमूद केले आहे. पावसाळा सुरू होताच झाडाचा झुकाव अधिक वाढला असून, हॉटेल व्यवसाय आणि रस्त्यावरील प्रवाशांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करत या विलायती चिंचेच्या झाडाच्या तोडणीस परवानगी द्यावी, अशी मागणी रांधवण यांनी केली आहे.

व्यावसायिकांच्या म्हणण्यानुसार, जर हे झाड अचानक कोसळले, तर त्यांचे मोठे नुकसान होऊ शकते आणि कुटुंबातील व्यक्तींना व कामगारांच्या जीवाला देखील धोका निर्माण होऊ शकतो. या अगोदरही दोनदा या विलायती चिंचेच्या झाडाची फांदी रस्त्यावर कोसळली आहे. त्यामुळे या प्रकरणाची ग्रामपंचायत प्रशासनासह वनविभाग आणि तलाठी यांनी वेळीच दखल घ्यावी अशी मागणी हॉटेल व्यावसायिक रांधवण यांनी केली आहे.

## शेखमिरेवाडी येथे मोफत रोपवाटिका कार्यक्रम संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, सातारा :** वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे हा संत तुकाराम महाराजांचा प्रसिद्ध अभंग आहे. याचा अर्थ असा आहे की, जंगलातील झाडं आणि वन्यजीव हेच माझे सोबती आहेत आणि हाच अभंग आपल्याला निसर्गाशी एकरूप होऊन जगायला शिकवतो. तुकाराम महाराज म्हणतात की, जंगलातील झाडं आणि वन्यजीव यांच्यासोबत राहून त्यांना खूप आनंद मिळतो. ते एकांतात राहून ही समाधानी आहेत आणि त्यांना कोणाचाही मत्सर किंवा द्वेष नाही. या अभंगातून, तुकाराम महाराज आपल्याला निसर्गाची किंमत आणि महत्व सांगतात. ते आपल्याला शिकवतात की, आपण निसर्गावर प्रेम करावे आणि त्याचे रक्षण करावे. याच ओवीच्या संकल्पनेतून वृक्ष वाटप खंडाळा तालुक्यातील शेखमिरेवाडी गावामध्ये, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ढोल लेझीम संघ शेखमिरेवाडी यांच्या सहकार्याने, उपसरपंच विशाल हणमंत शिंदे यांच्या कल्पनेतून व सौजन्याने आंबा रोपाचे सर्व ग्रामस्थांना प्रत्येक घरटी एक रोप वाटप करण्यात आले. ३०० रोपे गावातील सर्व ग्रामस्थांना वाटण्याचा कार्यक्रम ग्रामपंचायत शेखमिरेवाडीच्या प्रांगणामध्ये करण्यात आला. मोफत रोपवाटिका या संधीचा लाभ घ्यावा असे आव्हान विशाल शिंदे यांच्यातर्फे करण्यात आले होते. या संकल्पनेला ग्रामस्थांनी भरभरून प्रतिसाद दिला. ग्रामपंचायत कार्यालय शेखमिरेवाडी या ठिकाणी पार पडलेल्या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ मंडळी, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, तलाठी व ग्रामसेवक उपस्थित होते. यांचाही 'आंबा रोप' भेट देत सन्मान करण्यात आला. आंबा रोपाच्या चांगल्या संगोपणानंतर यापुढेही याच प्रमाणे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ढोल लेझीम संघ शेखमिरेवाडी यांच्या सहकार्याने व ग्रामपंचायत शेखमिरेवाडी यांच्या माध्यमातून चिंच या रोपाचे वाटप करणार असल्याचा असा मानस सरपंच विशाल शिंदे यांनी अक्षराज मीडिया ला बोलताना सांगितले.

## बावधन हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांची पन्नास वर्षांनी स्नेहमेळाव्यात भेट

**अक्षराज : दिलीप कांबळे**



**दि.१७, वाई (सातारा) :** स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या बावधन हायस्कूल बावधन तालुका वाई माजी विद्यार्थ्यांचा १९७५ सालची दहावी जुनी बॅच यांचा स्नेह मेळावा नुकताच आनंदी वातावरणात संपन्न झाला. बावधन हायस्कूलचे १९७५ सालचे माजी विद्यार्थी २०२५ ला तब्बल पन्नास वर्षांनी एकत्र आणणारा स्नेह मेळावा म्हणजे मोठी कसरत होती. पन्नास वर्षाची प्रतीक्षा एक महिना भेटण्याची ओढ आतुरता निर्माण झाली होती आणि तो दिवस पन्नास वर्षांनी उजाडला कोण कोण मुंबई पुणे दापोली खोपोली सातारा अशा वेगवेगळ्या वाटेने स्नेह मेळाव्यास आले. प्रकटला एक चैतन्यमय क्षण झाले. उत्साही वातावरण आणि घडलेला बदल सुरू झाल्या जुन्या आठवणींचा खेळ बहुसंख्येने उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मान्यवर म्हणाले पन्नास वर्षानंतर तुम्ही एकत्र येत आहात. अशीच ऊर्जा जागृत ठेवा सामाजिक बांधिलकी जपा शाळा माऊलीसाठी गरजू मुलांसाठी सढळ हाताने मदत करा. शैक्षणिक दर्जा सुधारण्यावर भर द्या विद्यार्थी घडवण्यासाठी पालकांना मार्गदर्शन करा. या स्नेह मेळाव्यात सुमनकाने सुधाकर कुंभार, संपत जायकर यांनी गाणी प्राध्यापक मिलिंद कांबळे यांनी कविता सादर केल्या. हिंदुराव रेवडे यांनी नाट्य प्रसंग सादर करत उत्कृष्ट अभिनय केला. यावेळी प्रत्येकाने आपली ओळख व प्रगती मोजक्या शब्दात मांडली. ६५ नंतर वय विसरून पुन्हा तरुण व्हा जीवनाचा आनंद घ्या स्वतःसाठी व समाजासाठी जगा तशी खूणगाठ मनाशी बाळगून एकमेकांनी खुल्या गप्पा मारल्या. माजी सैनिक भगवान भोसले, सुरेश भोसले, लालसिंग यादव, सुभाष पिसाळ यांच्या शुभहस्ते सर्वांना सन्मानचिन्ह ग्रुप फोटो देऊन सत्कार करण्यात आला. गुरुवर्य जाधव, मांढरे, डांगरे शिक्षक उपस्थित होते. सुमन कदम, लता शिंदे, शशिकला कदम या माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी निवृत्त मुख्याध्यापक धनसिंग कदम, शहाजी पिसाळ, प्राध्यापक रमेश पिसाळ, जलाल मोमीन, विलास भोसले, किसन भोसले, बाळासो कांबळे, शिरीष भोसले, दत्तू भोसले, रमेश भोसले, जनार्दन भोसले, ज्ञानेश्वर भोसले उपस्थित होते. शेवटी स्वादिष्ट भोजनानंतर निरोपाचा प्रसंग जवळ आला पानावलेल्या डोळ्यांनी एकमेकांचा निरोप घेतला.